# विद्युत लोकपाल (मुंबई)

(विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ४२(६) अंतर्गत)

अभिवेदन (Representation) क्रमांक ७० / २०२५

ग्राहकाचा वीज पुरवठा पुर्ववत करणे व नुकसान भरपाई मिळण्याबाबत

प्रशांत पांडुरंग पवार ........................................................................................ अपिलार्थी

विरूध्द

महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, रत्नागिरी (महावितरण) ............................................ प्रतिवादी १

सुनील पांडुरंग पवार ............................................ प्रतिवादी २

उपस्थिती :-

| | | |
|---|---|---|
| अपिलार्थींतर्फे | :- | १) प्रशांत पांडुरंग पवार<br>२) मयंक प्रशांत पवार |
| प्रतिवादी १ तर्फे | :- | जितेंद्र फुलपगारे, कार्यकारी अभियंता, रत्नागिरी |
| प्रतिवादी २ तफे | :- | सुनील पांडुरंग पवार |

कोरम :- वन्दना कृष्णा (भा.प्र.से. निवृत्त)

सुनावणी तारीख :- १९ ऑगष्ट २०२५

आदेश पारित दिनांक :- ३ सप्टेंबर २०२५

## आदेश

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २०२० (ग्राहक गाऱ्हाणे व विद्युत लोकपाल विनियम २०२०) मधील विनियम १९.१ अन्वये ग्राहक गाऱ्हाणे निवारण

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

मंच, महावितरण, कोल्हापूर परिमंडल, (मंच) यांच्या दिनांक १५ मे २०२५ च्या आदेशाविरुध्द अपिलार्थीने सदरचे अभिवेदन दिनांक २१ जुलै २०२५ रोजी दाखल केले. मंचाने दिनांक १५ मे २०२५ रोजीच्या आदेशान्वये अभिवेदन नामंजूर केले.

२. अपिलार्थीने त्यांच्या निवेदनातील व दिनांक १९ ऑगष्ट २०२५ रोजीच्या ई-सुनावणीदरम्यान सादर केलेले प्रमुख मुद्दे खालील प्रमाणे.

- कै. पांडुरंग मुघोजी पवार (मयत दिनांक १५ सप्टेंबर १९८६) यांच्या नावे घरगुती वीज जोडणी (ग्राहक क्र.२२३०८००००१११) दिनांक २८ ऑगष्ट १९७१ पासून लोवले, तालूका संगमेश्वर, जिल्हा रत्नागिरी येथ होतो. ग्राहकाचा पत्ता, मंजूर भार इत्यादीचा तपशील खालील तक्त्यात नमुद केला आहे.

तक्ता १

| Name | Consumer No. | Address | San. Load (KW) | Date of Supply | Temporary disconnection | Pemanently disconnection |
|---|---|---|---|---|---|---|
| Pawar Pandurang Muguji | 223080000111 | Lowale, Sangmeshawar | 0.26 | 28.08.1971 | 03.09.2024 | 02.02.2025 |

सदर घराचा ताबा दिनांक १५ ऑगष्ट २०२४ पासून अपिलार्थी यांच्याकडे आला. ग्राहक क्र.२२३०८००००१११ च्या वीज देयकावर त्यांचा मोठा भाऊ सुनील पांडुरंग पवार यांचा मोबाईल क्र.९७६५८८१०६२ हा नमुद केलेला होता व त्या सदर घराचा वापरही ते स्वतः (सुनील पवार) करत होते. त्यामुळे ऑगष्ट २०२४ पर्यंतच्या वीज देयकांचा भरणा प्रतिवादी क्रं. २ सुनील पांडुरंग पवार करणे बंधनकारक आहे.

दिनांक २ सप्टेंबर २०२४ रोजी अपिलार्थीने सदरची वीज जोडणी प्रशांत पांडुरंग पवार यांनी वीज देयकावरील वडीलांच्या नावा ऐवजी स्वतःच्या नावे बदल करण्यासाठी महावितरण संगमेश्वर कार्यालयात अर्ज केला (ऑनलाईन अर्ज व इतर भावांचे नाहरकत प्रमाणपत्र देण्यात आले नाही). महावितरणने सदर वीज जोडणीवर रु.२२४०/- ची थकबाकी असल्याने अपिलार्थीस

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

त्याचा भरणा करण्याचे सांगितले. परंतू ऑगष्ट २०२४ पर्यत सदर वीज जोडणीचा वापर हा त्यांचा भाऊ प्रतिवादी क्रं.२ सुनील पांडुरंग पवार करत असल्याने, अपिलार्थीने त्या थकीत वीज देयकांचा भरणा करण्यास नकार दिला, अपिलार्थीने असेन मुद केले की, महावितरणे प्रतिवादी क्रं. २ सुनील पांडुरंग पवार यांच्याकडून भरून घेण्यात यावी असे नमुद केले.

- त्यानंतर अपिलार्थीने दिनांक ५ सप्टेंबर २०२४ रोजीच्या महावितरणकडे दिलेल्या पत्रान्वये असे कळविले की, वडीलांच्या नावे असलेला ग्राहकाचा (क्र.२२३०८००००१११) घरगुती वीज पुरवठा महावितरणे खंडीत कला असे निदर्शनास आले. तसेच अपिलाथीच्या सर्व्हिस वायरला टॅपिंग करून प्रतिवादी क्रं. २ सुनील पांडुरंग पवार यांना वीज पुरवठा (ग्राहक क्रमांक २२३०८०००६५४२) झाल्याचे निदर्शनास आले. महावितरणच्या नियमावलीनुसार नवीन वीज जोडणीसाठी वायर मध्ये टॅपिंग न करता डायरेक्ट (पोल ते मीटर) देणे बंधनकारक असतानाही सर्व्हिस वायरला टॅपिंग करून अपिलार्थीच्या सर्व्हिस वायर मधून प्रतिवादी क्रं. २ सुनील पांडुरंग पवार यांना वीज पुरवठा झाला. सदर जोडणी ही महावितरणच्या वायरमन यांच्याशी संगनमताने झालेली आहे. सदर ठिकाणी प्रतिवादी क्रं. २ सुनील पांडुरंग पवार यांना मे २०२४ च्या आधीची थकबाकी भरून न घेताच त्यांना ८ ऑगष्ट २०२४ रोजी नवीन वीज जोडणी (वीज ग्राहक क्रमांक २२३०८०००६५४२) देण्यात आलो.
- दिनांक ६ सप्टेंबर २०२४ रोजी वीज देयके न भरल्यामुळे वीज पुरवठा खंडीत करण्याची नोटीस दरवाजावर चिटकवण्यात आली. परंतू वीज पुरवठा त्याआधी खंडीत करण्यात आला होता. दिनांक १४ डिसेंबर २०२४ रोजी थकीत वीज देयक रक्कम रु.१३५०/- भरण्यासाठी महावितरणकडून व्हॉटसअप वर वीज देयक पाठविण्यात आले. सप्टेंबर २०२४ ते नोव्हेंबर २०२४ या कालावधीत वीज पुरवठा खंडीत असतानाही जानेवारी २०२५ च्या वीज देयकावर मीटर फॉल्टी असे नमुद करून सरासरी वीज देयक पाठविली. दिनांक १७ सप्टेंबर २०२४ रोजी ग्राहक क्र.२२३०८००००१११ ची मे २०२४ च्या आधीच्या सर्व वीज देयकांचा भरणा प्रतिवादी क्रं.२ सुनील पांडुरंग पवार यांनी केला असल्याचे अपिलार्थीने नमुद केल आहे.
- अपिलार्थीने दिनांक १८ मार्च २०२५ रोजी महावितरणला वीज मीटर जागेवर नाही याबाबत केलेल्या अर्जास महावितरणने अपिलार्थीस दिनांक १८ मार्च २०२५ रोजी दिलेल्या उत्तरात नमुद केले की, अपिलार्थी हे मयत पांडुरंग मुगोजी पवार, ग्राहक क्र.२२३०८००००१११ च्या वीज देयकासंबधी देयके

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai
M.E.R.C.

न भरता वेगवेगळया अर्जानुसार कळवित आहात. सदर वीज जोडणी १७ सप्टेंबर २०२४ नंतर थकीत असल्याने वीज कायदा 2003 च्या कलम ५६ नुसार नोटीस एसएमएस द्वारे वीज देयकावरील नमुद मोबाईल नंबरवर जात होती व सदरची नोटीस मा. महाराष्ट्र वीज नियामक आयोगाच्या आदेशानुसार कायदेशीर आहे. सबब, वीज देयके न भरल्याने सदर वीज जोडणी कायमस्वरूपी खंडीत करण्यात आली. अपिलार्थीने नमुद केले की सदर एसएमएस पाठवलेला मोबाईल क्रमांक कोणाच्या नावावर आहे याची शहानिशा करणे याची जबाबदारी महावितरणची होती. त्यामुळे ज्या मोबाईल नंबरवर एसएमएस पाठविला आहे त्या मोबाईल धारकाने सदर थकबाकी भरणे बंधनकारक आहे. महावितरणच्या संगमेश्वर व रत्नागिरी कार्यालयाकडे माहिती अधिकार अंतर्गत मोबाईल नंबर संबधीत पुरावे मागितले असता त्याबाबत कोणतीही माहिती महावितरणने दिलेली नाही.

- अपिलार्थीने नमुद केले की मागील दहा महिन्यापासून त्यांच्या घरामध्ये वीज पुरवठा नसल्याने अंधार आहे. सदर वीज पुरवठा खंडीत होण्यास सर्वस्वी महावितरण व प्रतिवादी क्र.२ सुनील पांडुरंग पवार हे जबाबदार आहेत. सदर प्रकरणी अपिलार्थीस वारंवार चिपळूण ते संगमेश्वर प्रवास करावा लागत आहे. आवश्यक कागदपत्रे गोळा करावी लागत आहे, महत्वाची कागदपत्राची झेरॉक्स करावी लागत आहे तसेच महावितरणच्या कर्मचाऱ्याच्या चुकीची कार्यपध्दतीचा मला व माझ्या कुटूंबालाही मानसिक त्रास सहन करावा लागत आहे,
- अपिलार्थीने माननीय विद्युत लोकपाल मुंबई यांच्याकडे खालीलप्रमाणे मागणी केल्या
    - अपिलार्थीच्या वडीलांच्या नावे असलेलो वीज जोडणी (ग्राहक क्र.२२३०८००००१११) पुर्नस्थापित करून वीज पुरवठा सुरळीत करून देण्यात यावा व नावात बदल करून देण्यात यावा.
    - अपिलार्थींना नुकसान भरपाई म्हणून रू.५,००,०००/- देण्याचे प्रतिवादींना आदेशीत करण्यात यावे.

३ प्रतिवादी क्र.१ यांनी त्यांच्या निवेदनातील व दिनांक १९ ऑगष्ट २०२५ रोजीच्या ई-सुनावणीदरम्यान सादर केलेले प्रमुख मुद्दे खालील प्रमाणे.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

- कै. पांडुरंग मुघोजी पवार (मयत दिनांक १५ सप्टेंबर १९८६) यांच्या नावे घरगुती वीज जोडणी (ग्राहक क्र.२२३०८००००१११) दिनांक २८ ऑगष्ट १९७१ पासून होती. ग्राहकाबाबतचा तपशिल तक्ता क्र.१ मध्ये नमुद केली आहे.
- सदरच्या वीज देयकावर मे २०२४ पर्यंत रू.२१४८/- ची थकबाकी होती. वीज देयक भरणा करण्याबाबत वीज कायदा २००३ कलम ५६(१) नुसार वीज देयकावरील नोंदणी असलेल्या मोबाईल क्रमांकावर 97******62 वीज पुरवठा खंडीत करण्याबाबतची नोटीस देण्यात आली. त्यानंतर वीज वापरकर्त्यांनि रू.२१५०/- चा दिनांक १८ मे २०२४ रोजी भरणा केला. तदनंतर वीज वापरकर्त्यांनि (प्रतिवादी क्रं.२ सुनील पांडुरंग पवार) जून, जुलै व ऑगष्ट २०२४ ची वीज देयकांचा एकुण रू.२०६६/- चा भरणा कलम ५६(१) नुसार नोटीस देऊनही केला नाही म्हणून माहे ३ सप्टेंबर २०२४ रोजी तात्पुरत्या स्वरूपात वीज पुरवठा खंडीत करण्यात आला.
- प्रतिवादी क्रं.२ सुनील पांडुरंग पवार यांनी जून / जुलै व ऑगष्ट २०२४ रोजी त्यांच्या नावे बाजूच्या घराकरीता नवीन वीज जोडणीसाठी महावितरणकडे अर्ज केला. योग्य ती कागदपत्रे व जागेचे वेगळे असेसमंट असलेले कागदपत्रे सादर केले असल्यामुळे वीज जोडणीस मंजूरी दिली तसेच, प्रतिवादी क्रं.२ सुनील पांडुरंग पवार यांनी नवीन वीज जोडणीची डिमांड नोट भरल्यानंतर त्यांना दिनांक ८ ऑगष्ट २०२४ रोजी नवीन वीज जोडणी (वीज ग्राहक क्रमांक २२३०८०००६५४२) देण्यात आली.
- अपिलार्थी दिनांक २ सप्टेंबर २०२४ रोजी वीज जोडणी स्वतःच्या नावे करण्याकरीता आले असता, अपिलार्थीना कळविण्यात आले की, सदरहू प्रिमायसेस वर महावितरणची रू.२२४०/- थकबाकी आहे. तीचा कृपया भरणा करावा हे अपिलार्थीस कळविल व समजवून ही सांगण्यात आले. वीज देयकांचा भरणा केल्यानंतर नावात बदल करण्याच्या अर्जाचा विचार करता येईल हे स्पष्ट केले. तथापि, अपिलार्थीने ती वीज थकबाकी भरणार नाही व ती अपिलार्थीचे भाऊ प्रतिवादी क्रं.२ सुनील पांडुरंग पवार यांच्याकडून भरून घेण्यात यावी असे सांगितले. अपिलार्थी किंवा त्यांचा भाऊ सुनील कोणीही थकबाकी भरण्यास तयार नव्हते. सबब, अपिलार्थीच्या नावात बदल करण्याच्या अर्जाचा विचार करण्यात आला नाही.सदरहू वीज देयकाचा थकबाकी भरणा रू.२२४०/- प्रतिवादी क्रं.२ सुनील पांडुरंग पवार यांनी दिनांक १७ सप्टेंबर २०२४ रोजी कला. तदनंतर ऑक्टोबर व नोव्हेंबर २०२४ चे मिनिमम वीज देयके कोणीही भरले नाही. त्यावेळी सदर जागी कुठलाही वीज

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

वापर नव्हता. त्यानंतर सुध्दा पांडुरंग पवार याच्या नावे असलेलया देयकांचा भरणा कोणीही केला नाही. सबब, सदरहू वीज जोडणी प्रत्यक्षात २ फेब्रुवारी २०२५ रोजी मीटर काढून कायमस्वरूपी बंद करण्यात आला. तथापि, वीज प्रणालीद्वारे डिसेंबर २०२४ ते मार्च २०२५ या कालावधीत सदरहू वीज जोडणीवर फॉल्टी स्टेटसची वीज देयके गेली व मार्च २०२५ पर्यत अवास्तव थकबाकी रू.४९६८/- पर्यत झाली. फॉल्टी स्टेटस ची वीज देयके (डिसेंबर २०२४ ते मार्च २०२५) या कालावधीत वापर नसल्यामुळे सुधारीत करण्यात आली व वीज देयकावर रू.३६५३/- चे क्रेडीट देण्यात आले. त्यामुळे रू.१३२०/- ची थकबाकी शिल्लक राहीली. सदरहू थकबाकोचा भरणा करण्यास कोणीही पुढे आले नाही म्हणून थकबाकी वीज ग्राहकाच्या अनामत रक्कमेतून वळती करण्यात आली. सदर वीज देयकावर आज रोजी रू.२५९/- चे क्रेडीट वीज देयके आहे व सद्य स्थितोत कायमस्वरूपी बंद आहे.

- अपिलार्थींने मंचाकडे दिनांक २७ फेब्रुवारी २०२५ रोजी तक्रार दाखल केली. मंचाने दिनांक १५ मे २०२५ रोजीच्या आदेशान्वये अभिवेदन नामंजूर केले.
- सदरची वीज जोडणी कायमस्वरूपी खंडीत करण्याची कार्यवाही ही केवळ वीज देयकांचा भरणा वेळेत न केल्यामुळे वीज कायदा २००३ च्या कलम ५६ नुसार करण्यात आलेली आहे. त्यामुळे अपिलार्थींने सदरचा वीज देयकांचा भरणा हा अपिलार्थी यांचे भाऊ प्रतिवादी क्रं.२ सुनील पांडुरंग पवार यांच्या कडून करून घ्या हे अपिलार्थीचे म्हणने महावितरणची दिशाभुल करण्यासारखे आहे. याबाबत वीज देयकाचा कोणी भरणा करायचा हा निर्णय महावितरणचा नसून वीज देयके न भरल्यामुळे वीज पुरवठा खंडीत करण्याचा कायदेशीर अधिकार हा महावितरणचा आहे. थकीत वीज देयके भरणबाबतची नोटीस ही नोंदणीकृत मोबाईन नंबर एसएमएस द्वारे पाठविण्यात आलेली आहे. त्यामुळे वीज वापरकर्त्याची नियमानुसार वीज देयके भरण्याची जबाबदारी आहे. वीज पुरवठा खंडीत करणे ही बाब कोणत्याही परिस्थितीत वीज ग्राहकास नुकसान भरपाईस पात्र नाही.
- मंचापुढे अपिलार्थीने वीज देयकाचा भरणा वेळेत न केल्यामुळे वीज पुरवठा खंडीत करण्यात आला असल्याचे प्रतिवादी क्रं.१ महावितरणने स्पष्ट केले होते. प्रतिवादी क्रं.१ महावितरणने नमुद केले की, वीज देयकाची थकीत रक्कम रू.१३२०/- चा भरणा करून नवीन कागदपत्रासह चलन भरणा केल्यानंतर तातडीने नवीन वीज जोडणी देण्याबाबत अपिलार्थीस कळविले होते. परंतू अपिलार्थी

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai
M.E.R.C.

व प्रतिवादी क्रं.२ सुनील पांडुरंग पवार यांच्यातील वादामुळे त्यांनी वीज देयकांचा भरणा केला नाही.

- महाराष्ट्र वीज नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता, वितरण परवानाधारकांच्या कृतीची मानके आणि पॉवर क्वॉलिटी) विनियम २०२१ (वितरण परवानाधारकांच्या कृतीची मानके, विनियम २०२१) मधील विनियम १२.५ नुसार थकबाकी भरण्याची जबाबदारी ही वहिवाटदार, मालक, उत्तराधिकारी यांची असल्याने मंचाने अपिलार्थीचे अभिवेदन नामंजूर केले. तसेच वितरण परवानाधारकांच्या कृतीची मानके, विनियम २०२१ मधील विनियम ५.१ अन्वये अर्ज सादर केल्यानंतर कलम ४ अन्वये शेडयुल ऑफ चार्जेस प्रमाणे नवीन वीज जोडणीसाठी चलन भरणा केल्यानंतर तातडीने वीज पुरवठा करण्यात येईल याबाबत अपिलार्थीस कळविण्यात आले होते.
- महावितरण कंपनी कोणत्याही अर्जदारास नियम, विनियम व कायदा यांस अधीन राहून नवीन वीज जोडणी देण्यास, नावात बदल करण्यास बांधील आहे. याबाबत अपिलार्थीच्या पहिल्या अर्जापासूनच सकरात्मक दृष्टीकोन ठेऊन प्रयत्न केले आहेत. तसेच अपिलार्थीच्या माहिती अधिकार २००५ अंतर्गत केलेल्या अर्जासही माहिती देऊन त्यांचे सर्वतोपरी समाधान केलेले आहे.
- अपिलार्थी यांनी मा. विद्युत लोकपाल यांच्याकडे तक्रार दाखल करताना कोणतेही नवीन मुद्दे, तर्क, पुरावे, नियम, कायदे इत्यादी सादर केलेले नाही. सबब मंचाचे आदेश कायम ठेवण्यात यावे अशी मागणी प्रतिवादी महावितरणने केली आहे.

४. प्रतिवादी क्र.२ सुनील पांडुरंग पवार यांनी त्यांच्या निवेदनातील व दिनांक १९ ऑगष्ट २०२५ रोजीच्या ई-सुनावणीदरम्यान सादर केलेले प्रमुख मुद्दे खालील प्रमाणे.

- प्रतिवादी क्र.२ सुनील पांडुरंग पवार यांनी नमुद केले की मुक्काम लोवले, तालूका संगमेश्वर, जिल्हा रत्नागिरी येथील घर क्रं.२०२ ही सामुदायीक मालमत्ता असून सदर घरामध्ये त्यांच्या वडीलांचे नावे घरगुती वीज जोडणी चालू होती. सदरच्या जुन्या घराजवळ नवीन घर बांधल्याने ग्रामपंचायत लोवले यांनी मालमत्ता क्रं.२०२ हे प्रतिवादी क्र.२ सुनील पांडुरंग पवार यांच्या नावावर असेसमेंट उतारा दिल्यामुळे महावितरणकडे रितसर कागदपत्रासह अर्ज केल्यानंतर महावितरणने दिनांक ८ ऑगष्ट २०२४ रोजी प्रतिवादी क्र.२ सुनील पांडुरंग पवार यांच्या नावे नवीन घरगुती वीज जोडणी दिली. तसेच प्रतिवादी क्र.२ सुनील पांडुरंग पवार यांनी वडीलांच्या नावे असलेली

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

घरगुती वीज जोडणीची थकबाकी दिनांक १७ सप्टेंबर २०२४ रोजी पुर्णपणे भरली आहे. त्यामुळे त्यानंतरच्या वीज देयकाची जबाबदारी वीज वापर करीत नसल्याने प्रतिवादी क्र.२ सुनील पांडुरंग पवार यांची येत नाही. तसेच अपिलार्थीने वीज ग्राहक क्र.२२३०८००००१११ वरील नावावरील बदलासाठी केलेल्या अर्जास प्रतिवादी क्र.२ सुनील पांडुरंग पवार यांचा विरोध आहे. कोणत्याही प्रकारे सामाईक असलेली वडीलाच्या नावे असलेली वीज जोडणी अपिलार्थीस देऊ नये. प्रतिवादी क्र.२ सुनील यांनी स्वतः अनामत रक्कम व सर्व्हिस कनेक्शन चार्जेस भरून नवीन वीज जोडणी घेतली तशीच वस्तूतः अपिलार्थीनेही सुध्दा नियमानुसार नवीन वीज जोडणी घेणे हे अपेक्षीत आहे. तसेच सुनावणी दरम्यान वडील भावाचा सर्वांच्या समोर अपमान करणे व वाईट बोलने या सर्व बाबीं लक्षात घेऊन वडीलांच्या नावे असलेली वीज जोडणी कोणत्याही परिस्थितीत अपिलार्थीना देऊ नये. तसेच ज्या प्रिमायसेसवर अपिलार्थी वीज जोडणी मागत आहेत ते प्रिमायसेसची वाटणीसुदधा योग्य प्रकारे झाली नसल्याने आमच्या भावांचे ना हरकत दाखला अपिलार्थीने घेणे अपेक्षीत आहे.

विश्लेषण व निर्णय

५. दोन्ही पक्षकारांचे म्हणणे ऐकण्यात आले व उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन करण्यात आले. वरील प्रकरणाचा अभ्यास केला असता निदर्शनास येते की, कै. पांडुरंग मुघोजी पवार (मयत दिनांक १५ सप्टेंबर १९८६) यांच्या नावे घरगुती वीज जोडणी (ग्राहक क्र.२२३०८००००१११) दिनांक २८ ऑगष्ट १९७१ पासून होती.

६. अपिलार्थीने नमुद केले की, दिनांक २ सप्टेंबर २०२४ रोजी त्यांनी वीज देयकावरील (ग्राहक क्र.२२३०८००००१११) वडीलांच्या नावा ऐवजी स्वतःच्या नावे बदल करण्यासाठी महावितरण संगमेश्वर कार्यालयात अर्ज केला. महावितरणने सदर वीज जोडणीवर रु.२२४०/- ची थकबाकी असल्याने त्याचा भरणा करण्याचे सांगितले. परंतू ऑगष्ट २०२४ पर्यत सदर वीज जोडणीचा वापर हा त्यांचा भाऊ सुनील पांडुरंग पवार करत असल्याने, अपिलार्थीने त्या थकीत वीज देयकांचा भरणा करण्यास नकार दिला. तसेच अपिलार्थीचा मोबाईल क्रमांक वीज देयकावर नसल्याने अपिलार्थीस थकबाकीबाबत कोणतीही कल्पना नव्हती. अपिलार्थीच्या वडीलांच्या नावे असलेली वीज जोडणी (ग्राहक क्र.२२३०८००००१११) पुर्नस्थापित करून वीज पुरवठा सुरळीत करून देण्यात यावा व नावात बदल करून देण्यात यावा व

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

अपिलार्थींना नुकसान भरपाई म्हणून रु.५,००,०००/- देण्याचे प्रतिवादींना आदेशीत करण्यात यावे असे निवेदन अपिलार्थीने केले आहे.

७. प्रतिवादी क्र.२ सुनील पांडुरंग पवार यांनी नमुद केले की घर क्रं.२०२ ही सामुदायीक मालमत्ता असून सदर घरामध्ये त्यांच्या वडीलांचे नावे घरगुती वीज जोडणी चालू होती. वडीलांच्या नावे असलेली घरगुती वीज जोडणीची थकबाकी दिनांक १७ सप्टेंबर २०२४ रोजी प्रतिवादी क्र.२ सुनील पांडुरंग पवार यांनी पुर्णपणे भरली आहे. त्यामुळे त्यानंतरच्या वीज देयकाची जबाबदारी वीज वापर करीत नसल्याने त्यांची येत नाही. तसेच अपिलार्थीने वीज ग्राहक क्र.२२३०८००००१११ वरील नावावरील बदलासाठी केलेल्या अर्जास प्रतिवादी क्र.२ सुनील पांडुरंग पवार यांचा विरोध आहे. कोणत्याही प्रकारे सामाईक असलेली वडीलाच्या नावे असलेली वीज जोडणी अपिलार्थीस देऊ नये. प्रतिवादी क्र.२ सुनील पांडुरंग पवार यांनी स्वतः अनामत रक्कम व सर्व्हिस कनेक्शन चार्जेस भरुन नवीन वीज जोडणी घेतली तशीच वस्तूतः अपिलार्थीनेही सुध्दा नियमानुसार नवीन वीज जोडणी घेणे हे अपेक्षीत आहे.

८. प्रतिवादी क्र.१ महावितरण यांनी नमुद केले की, वीज वापरकर्त्याने जून, जुलै व ऑगष्ट २०२४ ची वीज देयकांचा एकुण रु.२०६६/- चा भरणा कलम ५६(१) नुसार नोटीस देऊनही केला नाही म्हणून माहे ३ सप्टेंबर २०२४ रोजी तात्पुरत्या स्वरूपात वीज पुरवठा खंडीत करण्यात आला. अपिलार्थी दिनांक २ सप्टेंबर २०२४ रोजी वीज जोडणी स्वतःच्या नावे करण्याकरीता आले असता (नावात बदल करण्याकरीता ऑनलाईन अर्ज केला नाही) त्यांना कळविण्यात आले की, सदरहू प्रिमायसेस वर महावितरणची रु.२२४०/- थकबाकी आहे. तीचा कृपया भरणा करावा. अपिलार्थीने ती वीज थकबाकी भरणार नाही व ती अपिलार्थीचे भाऊ सुनील पांडुरंग पवार यांच्याकडून भरून घेण्यात यावी असे सांगितले. तथापि, अपिलार्थी किंवा त्यांचा भाऊ सुनील पांडुरंग पवार कोणीही थकबाकी भरण्यास तयार नव्हते. सदरहू वीज देयकाचा थकबाकी भरणा रु.२२४०/- दिनांक १७ सप्टेंबर २०२४ रोजी प्रतिवादी क्र.२ सुनील पांडुरंग पवार यांनी केला. तदनंतर ऑक्टोबर व नोव्हेंबर २०२४ चे मिनिमम वीज देयके कोणीही भरले नाही. त्यावेळी सदर जागी कुठलाही वीज वापर नव्हता. त्यानंतर सुध्दा पांडुरंग पवार याच्या नावे असलेलया देयकांचा भरणा कोणीही केला नाही. सबब, सदरहू वीज जोडणी प्रत्यक्षात २ फेब्रुवारी २०२५ रोजी मोटर काढून कायमस्वरुपी बंद करण्यात आला. फॉल्टी स्टेटस ची वीज देयके (डिसेंबर २०२४ ते मार्च २०२५) या कालावधीत वापर नसल्यामुळे सुधारीत करण्यात आली व वीज देयकावर रु.३६५३/- चे क्रेडीट देण्यात आले. त्यामुळे रु.१३२०/- ची थकबाकी शिल्लक राहीली. सदरहू थकबाकीचा भरणा करण्यास कोणीही पुढे आले नाही

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

म्हणून थकबाकी वीज ग्राहकाच्या अनामत रक्कमेतून वळती करण्यात आली. सदर वीज देयकावर आज रोजी रु.२५९/- चे क्रेडीट वीज देयके आहे व सद्य स्थितीत कायमस्वरूपी बंद आहे. महावितरण कंपनी कोणत्याही अर्जदारास नियम, विनियम व कायदा यांस अधीन राहून नवीन वीज जोडणी देण्यास, नावात बदल करण्यास बांधील आहे. जुनी वीज जोडणी दिनांक २ फेब्रुवारी २०२५ रोजी कायमस्वरूपी बंद झाली असल्याने ती पुन्हा चालू करण्याचा प्रश्नच उदभवत नाही. अपिलार्थीने नवीन वीज जोडणीसाठी नियमानुसार अर्ज केला तर प्रतिवादी क्रं.१ त्यांना सर्वतोपरी सहाय्य करून व योग्य ते अनामत रक्कम, प्रोसेस फी व इतर चार्जेस भरल्यानंतर तात्काळ वीज जोडणी देण्यात येईल असे आश्वासीत केले.

९. अपिलार्थीने महावितरणकडे दिनांक ५ सप्टेंबर २०२४ रोजी वडीलांच्या नावे वीज जोडणी (ग्राहक क्र.२२३०८००००१११) असलेली स्वतःच्या नावे करण्यासाठी ऑनलाईन अर्ज व इतर भावांचे ना हरकत प्रमाणपत्र सादर न करता अर्ज केला. त्यावेळी सदरही वीज जोडणीवर रु.२२४०/- ची थकबाकी होती. सदरहू थकबाकी त्यांचे बंधू प्रतिवादी क्र.२ सुनील पांडुरंग पवार यांच्याकडन वसूल करण्याचा आग्रह महावितरणकडे केला. सदरहू थकबाकी दिनांक १७ सप्टेंबर २०२४ रोजी पुर्णपणे भरली असल्याचे निदर्शनास येते. अपिलार्थीने त्यांच्या निवेदनात सदर घराचा ताबा दिनांक १५ ऑगष्ट २०२४ पासून त्यांच्याकडे आला आहे असे नमुद केले आहे. त्यामुळे दिनांक १५ ऑगष्ट २०२४ च्या नंतरची वीज देयकांचा भरणा अपिलार्थीने करणे नैसर्गिक रीत्या अपेक्षीत होते. परंतू भावा भावतील वादामुळे वीज देयके कोणीही भरली नाहीत. प्रतिवादी महावितरणने सप्टेंबर २०२४ वीज जोडणी तात्पूरत्या स्वरूपात खंडीत केली व दिनांक २ फेब्रुवारी २०२५ रोजी मीटर काढून कायमस्वरूपी बंद केली. तसेच त्यावरील अनामत रक्कमेचे थकबाकीमध्ये वळती केली. सबब, सदरहू वीज जोडणी परत चालू करण्याचा पश्न उदभवत नाही.

१०. मंचाने त्यांच्या दिनांक १५ मे २०२५ च्या आदेशात या सर्व बाबींचा योग्य तो उहापोह केला आहे. सबब, मंचाचे आदेश कायम ठेवण्यात येत आहे व अपिलार्थीचे अभिवेदन फेटाळण्यात येत आहे.

११. अपिलार्थीना निर्देशीत करण्यात येत आहे की, त्यांनी महाराष्ट्र वीज नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता, वितरण परवानाधारकांच्या कृतीची मानके आणि पॉवर क्वॉलिटी) विनियम २०२१ (वितरण परवानाधारकांच्या कृतीची मानके, विनियम २०२१) मधील नवीन वीज जोडणीसाठी मार्गदर्शक तत्वे दिली आहेत, त्यानुसार नवीन घरगुती वीज जोडणीसाठी प्रतिवादी महावितरणकडे अर्ज करावा. योग्य तो अर्ज

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

केल्यानंतर प्रतिवादी महावितरण यांना आदेशीत करण्यात येत आहे की, सदरहू जागेवर इतर कोणाचो हरकत असली तरी सुध्दा अपिलार्थींच्या नावे नवीन वीज जोडणी १५ दिवसात देण्यात यावी.

१२. आदेशाचे अनुपालन अहवाल आदेशाच्या दिनांकापासून दोन महिन्यात सादर करण्यात यावा.

१३. अपिलार्थींच्या इतर मागण्या फेटाळण्यात येत आहेत.

सही/-
(वंदना कृष्णा)
विद्युत लोकपाल (मुंबई)

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai
M.E.R.C.